जगभर

द ग्रेट गेम : अध्याय तिसरा

चंद्रशेखर पुरंदरे

पार्श्वभूमी

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी मध्य आशियावर सत्ता प्रस्थापित करण्यासाठी रशियन साम्राज्य व ब्रिटिश साम्राज्य यांच्यात रस्सीखेच सुरू झाली. त्याला द ग्रेट गेम (The Great Game) म्हणतात. मध्य आशिया म्हणजे आताचे कझाकस्तान, उझ्बेकिस्तान, टर्कमेनिस्तान, ताजिकीस्तान व किर्गीझीस्तान. हे सगळे देश रशिया-इराण-अफगाणिस्तान-चीन-मंगोलिया यांनी वेढलेले आहेत. दोनशे वर्षांपूर्वी ते 'देश' असे नव्हते पण तो भू-भाग गिळंकृत केल्यानंतर रशियन साम्राज्य दक्षिणेकडे अफगाणिस्तान व पूर्वेकडे मंगोलिया-चीनपर्यंत आले. ते अफगाणिस्ताननंतर भारताकडे वळेल या भीतीने १८३८ ला ब्रिटिशांनी अफगाणिस्तानात शिरकाव केला. तेव्हापासून १९१७ च्या रशियातील बोल्शेविक क्रांतीपर्यंत या दोन साम्राज्यातील संघर्ष कायम राहिला. १९१७ नंतर द ग्रेट गेमचा दुसरा अध्याय सुरू झाला. कारण बोल्शेविक क्रांतीने तोपर्यंतचा इतिहासच (म्हणजे तोपर्यंतचे आंतरराष्ट्रीय करार, वचने, वगैरे) पुसून टाकला. पण या भूभागाची हाव शाबूत असल्याने दुसऱ्या महायुद्धानंतरही १९४९ पर्यंत दुसरा अध्याय चालू राहिला. दरम्यान ब्रिटिश साम्राज्यही आक्रसत होते व रशियाने अफगाणिस्तानपर्यंत थांबणे स्वीकारले. (परत १९७९ ला रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केले पण तो ग्रेट गेमचा भाग धरला जात नाही कारण दुसरी कोणतीच महासत्ता विरोधात नव्हती.)

रशियाची आधीची राजधानी सेंट पीटर्सबर्ग व नंतर मॉस्को आणि लंडन येथून द ग्रेट गेमची व्यूहरचना होत असे. मग सोविएत युनियनचा उदयास्त झाला. १९९०-९१ ला वर उल्लेख केलेली राष्ट्रे पुन्हा स्वतंत्र झाली. आणि या प्रदेशावर नियंत्रण कोणाचे हा आधुनिक वसाहतवाद सुरू झाला.

त्यासाठी NATO चा थोडा आढावा घ्यायला लागेल. North Atlantic Treaty Organisation (NATO) दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झाली. मूळ उद्देश महायुद्धाने दुर्बल झालेल्या युरोपला अमेरिकेचे संरक्षण देणे. संरक्षण कोणापासून तर कम्युनिझमपासून म्हणजे सोविएत युनियन आणि त्याच्या प्रभावक्षेत्राखालील पूर्व युरोप. त्यामुळे वस्तुत: सोविएत युनियनच्या विलयानंतर NATO ची जरूरीच नव्हती. पण तीन प्रमुख कारणांनी NATO आज अस्तित्वातच नाही तर वर्धिष्णुही आहे. पहिले कारण म्हणजे अमेरिकेची युद्धखोरी अधिक साम्राज्यवाद. दुसरे कारण म्हणजे पश्चिम युरोपची (काल्पनिक) भयग्रस्तता. तिसरे कारण म्हणजे विलयानंतर सोविएत युनियनमधून बरेचसे देश फुटून निघाले. ते देश आणि सोविएत युनियनच्या अंमलाखाली असलेले पूर्व युरोपातील आधीचे कम्युनिस्ट देश यांना रशिया परत आपल्याला गिळंकृत करेल काय ही भीती आहे. त्यामुळे NATO च्या स्थापनेच्या वेळी बारा सभासद होते, ते आता २८ आहेत आणि काही देश प्रतीक्षायादीवरही आहेत. नवीन सभासद मिळताच अमेरिकेने तातडीने नवीन लष्करी तळ या देशांमध्ये स्थापन केले व योजले आहेत. त्यामुळे रशियाची अस्वस्थता वाढू लागली. रशियाच्या पश्चिम आघाडीवर जशी नेटोने हातपाय पसरायला सुरूवात केली, तशीच दक्षिण आघाडीवर म्हणजे मध्य आशियात. २००१च्या अफगाण युद्धाच्या निमित्ताने NATO ने किर्गीझीस्तानमध्ये हवाई तळ आणला. त्याचे नियोजन अमेरिकन हवाई दल करते. त्यासाठी किर्गीझ सरकार नेटोकडून भरपूर भाडे घेते, पण तो तळ २०१४ ला बंद होईल. उझ्बेकिस्तानमध्येही अमेरिकन मिलिटरी तळ आहे. पण तेथील सर्वेसर्वा व अमेरिका यांच्यात मतभेद झाल्याने व प्रामुख्याने चीन आणि रशियाच्या दबावाने २००५ साली हा तळ बंद झाला. पण आता परत अमेरिका उझ्बेकिस्तानच्या हुकूमशहाला प्रचंड पैसा व शस्त्रे पुरवत आहे आणि अफगाणिस्तानमधून बाहेर पडल्यावर तेथली शस्त्रास्त्रे उझ्बेकिस्तानला जवळजवळ फुकटातच मिळायची शक्यता आहे.

NATO च्या या कारवायांना व विस्तारवादाला उत्तर म्हणून १९९६ साली चीन, रशिया, कझाकस्तान, ताजिकीस्तान व किर्गीझीस्तान या पाच देशांनी 'शांघाय पाच' नावाची संघटना स्थापन केली. त्यात चीन-रशियाचा पुढाकार होता. (रशियाचे लष्करी तळ कझाकस्तान, किर्गीझीस्तान व ताजिकीस्तानमध्ये आहेतच!) २००१ साली 'शांघाय पाच'मध्ये उझ्बेकिस्तानचा समावेश होऊन शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) स्थापन करण्यात आली. SCO ची यावर्षीची परिषद जूनमध्ये बीजींगला झाली. वरील सहा संस्थापक देशांखेरीज इतर संलग्न देशांना 'निरीक्षक' म्हणून घेण्यात आले आहे. २००५ साली भारत, पाकिस्तान, इराण व मंगोलिया निरीक्षक झाले तर यावर्षी अफगाणिस्तानचा समावेश झाला. संस्थापक, निरीक्षक याखेरीज 'संवादक' अशीही एक श्रेणी आहे. तुर्कस्तान, बेलारूस व श्रीलंका

संवादक आहेत. या प्रत्येक देशाचे SCO त सामील होण्यामागचे हिशेब वेधक असले तरी एका लेखाच्या मर्यादेत तेवढ्या तपशीलात जाता येणार नाही. म्हणून एकूण SCO ची दिशा, उघड धोरणे व सुप्त धोरणे पाहू. त्यासाठी या संघटनेतील देशांची राजकीय जडण-घडण पहाणे उद्‌बोधक ठरावे.

संस्थापक देशांची राजकीय व्यवस्था पाहता कोणीच अस्सल निर्वाचित लोकशाही नाही. प्रथम रशिया. तेथे निवडणुका हा फार्स आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर कडक बंधने आहेत. १९९९ पासून घटनेतून पळवाटा काढत, बनावट 'मतदाना'तून पुतीन महाशय काही वर्षे अध्यक्ष मग पंतप्रधान मग परत अध्यक्ष राहिलेले आहेत. त्या देशाची वाटचाल अघोषित हुकूमशाहीकडे चालू आहे. परत एकदा अध्यक्ष झाल्यावर या जूनमध्ये पुतीनने एक नवीन कायदा केला. त्यानुसार राजकीय विरोधकांना सार्वजनिक निदर्शने करायलाही बंदी करण्यात आली आहे. त्याविरुद्ध मॉस्कोने प्रचंड मोर्चेही निघत आहेत.

चीनमध्ये उमरावशाही व लष्करशाही एकत्र आलेल्या आहेत. विकास प्रकल्पाला असो किंवा भ्रष्टाचाराला असो, विरोध स्थानिक पातळीवर दडपला जातो. इंटरनेटमुळे विरोधाची व्याप्ती वाढणे रशियासारखेच चीनलाही खपत नाही.

उरलेल्या बहुतेक देशांमध्ये राष्ट्रनिर्मितीपासूनच हुकूमशाही-घराणेशाही अबाधित आहे. उदाहरणार्थ कझाकस्तानच्या निर्मितीपासूनच नूरसुलतान नाझार्बाएव(Nursultan Nazarbayev) हाच एकमेव अध्यक्ष गेली २२ वर्षे आहे. तीच गोष्ट उझ्बेकिस्तान आणि ताजिकीस्तानची. किर्गीझीस्तानमध्ये सत्ताधीश बदलत आले आहेत पण ते आधीच्यापेक्षा नंतरचा जास्त भ्रष्टाचारी निघाल्याने. २०१० साली भ्रष्टाचारी सरकारविरुद्ध देशभर असंतोष व निदर्शने झाली ती निदर्शकांना ठार मारून दडपण्यात आली. 'अरब वसंत' सुरू होण्याआधीच्या मध्यपूर्वेतील देशांसारखीच या देशांतील परिस्थिती आहे. ही झाली 'संस्थापकां'ची राजकीय संस्कृती. 'निरीक्षका'तील इराणमध्ये खरी सत्ता पडद्यामागच्या कडव्या शिया इस्लामी धर्मगुरूंच्या हातात असते. दाखवायचे प्यादे अध्यक्ष अहमदिनिजाद. अरब वसंताच्या दरम्यान इराणमधील उभरत्या लोकशाहीवादी नागरी विरोधाला गुंडगिरीने दडपून व बहुधा खोट्या मतदानाने ते पुन्हा अध्यक्ष झाले. पाकिस्तानची लोकशाही हा तर क्रूर विनोद आहे. लष्कर व धर्ममार्तंड धोरण ठरवतात. त्यात भ्रष्टाचारी निर्वाचित सरकार. अफगाणिस्तानचे करझाईही मागील निवडणूक 'चोरून' अध्यक्ष झाले. बेलारूसचे अध्यक्ष तर विरोधकांना उघडउघड गोळ्या घालून ठार मारत सत्तेवर राहिलेले आहेत, तेही १९९४ पासून आजतागायत.

म्हणजे, SCO च्या चौदा देशांतील भारत, श्रीलंका, तुर्कस्तान व मंगोलिया काही प्रमाणात तरी लोकशाही म्हणता येतील. लोकशाही म्हणजे निर्वाचित प्रतिनिधी नव्हे तर समाजातील सर्वात उपेक्षित व सर्वहारा समूहाला आपल्या शोषणाविरुद्ध, व्यवस्थात्मक दमनाविरुद्ध आवाज उठवण्याची मुभा असते का, या निकषावर SCO चे बहुसंख्य सभासद निखळ दडपशाहीच दिसतात. चीनने या मार्गाने सामाजिक विकास त्या प्रमाणात नाही तरी आर्थिक विकास तर घडवून आणला. तीच गोष्ट थोड्याफार प्रमाणात - आर्थिक विकासाबाबत, दडपशाही नव्हे - अलिकडच्या भारताची. हे दोन मोठे देश व श्रीलंका सोडता रशियासकट बाकीचे देश नैसर्गिक संसाधने विकून हुकूमशहा व त्यांचे साथीदार यांनाच व्यक्तिश: संपन्न करत आहेत किंवा देशाची जुजबी अर्थव्यवस्था रशियासारखी चालवत आहेत.

आता SCO चा भू-राजकीय दृष्टिकोन पाहू. त्यासाठी NATO ची दखल घेतली आहेच. एकूण अमेरिकन साम्राज्यवाद पूर्वेकडे सरकत आहे. ऑस्ट्रेलियातही लष्करी तळ उभारण्याचा इरादा ओबामांनी व्यक्त केला आहे. चीनच्या शेजारी रशिया, जपान, विएतनाम वगैरे देशांशी चीनच्या विविध बेटे, भूभाग यांच्या मालकीवरून सतत कुरबुरी होत असतात. रशिया सोडा पण इतर देशांच्या बाजूने चीनविरोधी भूमिका घेण्यात अमेरिका पुढे असते. SCO तर्फे पश्चिमेच्या व विशेषत: अमेरिकेच्या या विस्तारवादाला विरोध करणे हे SCO चे प्रमुख उद्दिष्ट झाले आहे. G-8 आणि NATO यांच्या परिषदा SCO परिषदेच्या जरा आधीच होत्या. त्यांना हजर राहण्याचे आमंत्रण नाकारून पुतीन SCO परिषदेला जूनमध्ये गेले. एप्रिलमध्ये चीन व रशियाने संयुक्त आरमारी कवायती केल्या होत्या. जागतिक क्षेपणास्त्र आघाडीत भारताने सामील व्हावे यासाठी गेल्या सप्टेंबरपासून नेटोने दडपण आणायला सुरूवात केली आहे ही गोष्ट या संदर्भात लक्षात ठेवावी. त्यामुळे SCO च्या व्यासपीठावरून पश्चिमेला विरोध करणे हे रशियाचे उद्दिष्ट आहे. (तसेच इराण, बेलारूसचे आहे, ते पुढे पाहू.)

चीनच्या दृष्टीने औद्योगिक विकास चालू ठेवण्यासाठी प्रचंड प्रमाणावर कच्च्या मालाचा सतत पुरवठा आवश्यक आहे. मध्य आशिया, इराण, अफगाणिस्तान खनिज, नैसर्गिक तेल, वायू वगैरेंनी समृद्ध प्रदेश आहे. या संसाधनांवर नियंत्रण हा प्रामुख्याने अमेरिका व चीन यांच्यात उलगडणाऱ्या ग्रेट गेमचा तिसरा अध्याय आहे.

कझाकस्तान, उझ्बेकिस्तान, टर्कमेनिस्तानातून प्रचंड प्रमाणावर वायू, तेल मिळवण्यासाठी दीर्घ मुदतीचे करार चीनने केले आहेत. इराण आता पाकिस्तान-अफगाणिस्तानाहून चीनपर्यंत तेलवाहिन्या टाकणार आहे. मध्य आशियात चीनची गुंतवणूक, २०१० साली २३ अब्ज डॉलर्स होती, तर युरोपची २१ अब्ज डॉलर्स. रशियातूनही या गोष्टी चीनला हव्या आहेत पण किंमतीवर त्यांचे मतैक्य होत नाही. अफगाणिस्तान खनिजांनी समृद्ध देश

आहे. गेल्या जवळजवळ पन्नास वर्षांच्या युद्धग्रस्ततेने उत्खनन शक्य झालेले नाही. ऐनाक नावाच्या ठिकाणी तांब्याचे साठे आहेत. त्या एका ठिकाणीच चीनने साडेतीन अब्ज डॉलर्स गुंतवले आहेत. त्याबरोबरच रस्ते, रेल्वे बांधण्याचे अफगाण सरकारला आश्वासन दिले आहे. अफगाणिस्तानातील ही सगळ्यात मोठी परकीय गुंतवणूक आहे. तलेबानने तेथे अडसर आणू नयेत म्हणून चीनने तलेबानशी प्रत्यक्ष संवादही साधला आहे. म्हणजे एखादा SEZ स्थापन होण्याआधीच संभाव्य विस्थापितांशी रिलायन्सने चर्चा करण्यासारखा किंवा एखाद्या नियोजित प्रकल्पाजवळच्या वनवासींशी वेदान्तने चर्चा करण्यासारखा हा प्रकार आहे. त्यात वरवर पाहता गैर काही वाटले नाही तरी, राष्ट्र-राज्यालाच या वाटाघाटीतून वगळले जाणे हा गंभीर प्रकार आहे. राष्ट्र-राज्याचे सार्वभौमत्वच व्यापारी फायद्यासाठी नाकारले जात असेल तर या धोरणाला वसाहतवादच म्हणावे लागेल.

या अघोषित उद्दिष्टांनंतर SCO ची घोषित उद्दिष्टे पाहू.

संस्थापक देशांच्या यादीकडे एक नजर टाकली की चीन व रशिया सोडता बाकी देश मुस्लिम बहुसंख्य आहेत. मुस्लिम आतंकवाद हा सध्याचा जगातील युक्त किंवा अयुक्त सर्वमान्य महत्त्वाचा प्रश्न आहे. हा आतंकवाद देशाच्या सीमा मानत नाही. त्याचे जगाच्या या भागातील प्रमुख केंद्र पाकिस्तान-अफगाणिस्तान आहे. चीन व रशियाला त्यांच्या देशातील मुस्लिम अल्पसंख्य या मार्गाकडे वळतील अशी धास्ती आहे. त्यांच्या शासकीय धोरणांनी वस्तुत: ते या अल्पसंख्यांकांना आतंकवादी व्हायला भाग पाडत आहेत. हीच धास्ती उर्वरित संस्थापक देशांतील हुकूमशहांना (मध्यपूर्वेसारखीच) आहे. त्यामुळे मुस्लिम आतंकवादाला संयुक्तपणे आळा घालणे हे SCO चे प्रमुख उद्दिष्ट आहे.

दुसरे घोषित उद्दिष्ट म्हणजे अंमली पदार्थांच्या निर्मितीवर व व्यापारावर नियंत्रण किंवा त्यांचा समूळ नाश करणे. आज अफगाणिस्तान जगातील ९०% अफू निर्माण करतो. ती जगभर विविध अंमली पदार्थ बनवण्यासाठी निर्यात होते. एका अंदाजानुसार ८ ते १०% अफगाण प्रौढ (स्त्रियाही त्यात आहेत. आकडेवारीत १८ वर्षांखालील वयोगट नाही. पण १२-१३ व्या वर्षापासून व्यसनाधीनता सुरू होते.) म्हणजे, जवळजवळ १० लाख अफगाण व्यसनाधीन आहेत. चीनमध्ये ३५ लाख तर रशियात २५ लाख असे व्यसनाधीन असावेत. यावरून या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात यावे. त्यामुळे SCO चे हे दुसरे उद्दिष्ट आहे. अफगाणिस्तानला निरीक्षक म्हणून घेण्याचे हेही एक कारण आहे.

२०१४ मध्ये NATO अधिकृतरीत्या अफगाणिस्तानातून बाहेर पडेल. तलेबान व अराजक यावर NATO च्या अस्तित्वाने जे काही थोडेफार नियंत्रण आज आहे, तेही गेले की निर्माण होणारी पोकळी भरून काढायला SCO चे सगळेच देश उत्सुक आहेत. त्यातही पाकिस्तान अग्रेसर आहे. पण मुळातच तो देश स्वत:च इतका पोखरलेला आहे, की त्याच्यात ती ताकदच नाही. चीनलाही ते सोईचे आहे. कारण त्यामुळे चीनचे पाकिस्तानवर नियंत्रण रहाते.

चीनकडून पाकिस्तानला लष्करी मदत ही परंपरा आहे. ती मदत भारताविरुद्ध वापरण्यासाठी असते हे उघड आहे कारण पाकिस्तानला दुसरा शत्रूच नाही. भारताला त्या सीमेवरून उसंत न देण्यासाठी चीनलाही हे सोईचे आहे. दुसरीकडे, पाकिस्तानची तलेबानला फूस असल्याने आपल्या अफगाण व्यापारी संबंधात तलेबान फार अडथळे आणणार नाहीत यासाठीही चीनला पाकिस्तानचा उपयोग आहे.

SCO चे म्होरके दोन-चीन आणि रशिया. विशेष म्हणजे, या दोन्ही देशांची परकीय व्यापारी मिळकत SCO बाहेरील देशांकडूनच आहे. चीन ज्यांच्याशी व्यापार करतो, त्यातील पहिल्या दहा देशांतही रशिया नाही. (अमेरिका पहिली, जपान दुसरा, तर भारत दहावा आहे.) तीच गोष्ट रशियाची. २०१० साली रशियाचा जागतिक व्यापार सुमारे ३१० अब्ज युरो होतो. त्यातला २२० अब्ज युरो युरोपच्या २७ देशांबरोबरच होता. चीन-रशिया व्यापाराचे परिमाण त्यामानाने नगण्य आहे. यावरून हे लक्षात घ्यावे की SCO ने पश्चिमेविरुद्ध कितीही आवाज केला, तरी त्यांचे आर्थिक अस्तित्व SCO बाहेरच्या व्यापारावर अवलंबून आहे.

आता सध्याच्या दोन जागतिक महत्त्वाच्या घडामोडींवरील SCO ची भूमिका पाहू. ती SCO चा भूराजकीय रोख स्पष्ट करेल. पहिली प्रक्रिया म्हणजे सीरियन हत्याकांड; दुसरी इराणचा अणुप्रकल्प. या सदरातील मागील एका लेखात म्हटल्याप्रमाणे आजवर सीरियन राजवटीने युनोच्या अंदाजानुसार १३,००० निरपराध नागरिक (त्यात स्त्रिया व मुलेही) ठार मारली असली तरी SCO सीरियाचा निषेध करत नाही. चीन व रशिया सीरियावरील निर्बंधांना युनोचे अडथळा आणतात. त्याचे रशियन कारण म्हणजे सीरियात रशियाचा लष्करी तळ आहे आणि सीरिया रशियाच्या लष्करी सामुग्रीचा ग्राहक आहे. अगदी विद्यमान हत्याकांडासाठी रशियाने आधुनिक हेलिकॉप्टर्स सरकारी लष्कराला पुरवल्याच्या बातम्या बाहेर येत आहेत. ती अर्थातच विरोधकांना चिरडण्यासाठी युनो, अरब लीग या दोन्हींनी कोफी अनान या युनोच्या माजी अध्यक्षाला सीरियन सरकारशी वाटाघाटी करून हत्याकांड थांबवावे यासाठी चर्चा करायला नियुक्त केले होते. त्यानेही आता सीरिया यादवीपर्यंत पोचला आहे असे कबूल केले. तरीही SCO ने हा सीरियाचा अंतर्गत मामला आहे, हिंसाचार थांबलाच पाहिजे पण परकीय हस्तक्षेप नको हेच पालुपद चालू ठेवले. NATO, पश्चिम यांच्या साम्राज्यवादी धोरणाबद्दल आक्षेप असणे निराळे व केवळ पश्चिम सीरियाविरुद्ध आहे म्हणून

सीरियाविरुद्ध बोलायचेच नाही हे धोरण निराळे. जगाच्या अलिप्ततेमुळे रवांडा (Rwanda) या आफ्रिकेतील देशात लाखोंनी लोक वांशिक हिंसाचारात मरण पावले हा ताजा इतिहास आहे. त्यातल्या त्यात दिलासा देणारी बाब म्हणजे 'मध्यपूर्वेत अण्वस्त्रे नकोत' अशी नि:संदिग्ध घोषणा (अण्वस्त्रधारी) चीनने केली. ती इराणला उद्देशून होती.

आणखी एक मुद्दा नमूद करायला हवा तो म्हणजे, हे सगळेच देश इतरही अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचे सभासद आहेत. उदाहरणार्थ, ज्या NATO विरुद्ध रशिया कंठशोष करतो त्याचNATO चा तुर्कस्तान १९५५ सालापासून सभासद आहे. तेथेNATO चे २४ तळही आहेत. SCO अशा अंतर्विरोधांनी ग्रस्त आहे.

निष्कर्ष

SCO जगाची 'नवी घडी' बसवण्याचा दावा करते. चीन व भारत सभासद असल्याने SCO च्या सभासद देशांची एकूण लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या निम्म्याहून जास्त आहे. त्यामुळे SCO चा हा दावा तपासणे आवश्यक आहे. एकतर बहुतेक देश हुकूमशाही व समाजाला दडपणारे आहेत. ही 'नवी घडी' श्रेयस्कर नाही.

दुसरे म्हणजे, संपत्ती निर्माण करण्याचा पश्चिमेचाच पारंपरिक मार्ग चीन किंवा भारत अवलंबत आहेत. तो मार्ग म्हणजे गरजा वाढवा आणि त्या पुरवण्यासाठी 'उद्या नाहीच' या चंगळवादी तत्त्वावर निसर्गाचा नाश करा. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ - औद्योगिक विकास हे विकासाचे निकष आहेत. मग विकासाची फळे समाजांतर्गत कोठे जातात याकडे दुर्लक्ष करण्यात येते. आफ्रिकेतील हुकूमशाही राजवटींकडून नैसर्गिक संसाधने केवळ व्यापारी हिशेबाने मिळवण्याची चीनची वर्तणूक आहे. तीच वर्तणूक मध्य आशियात आहे. तद्देशीय बृहत्समाजाची चीनला फिकीर नसते. अशा व्यापाराने तद्देशीय विषमता वाढते हे वारंवार दिसून आले आहे. पण ज्या देशाला आपल्याच देशातल्या तळातल्या स्तराची पर्वा नाही, तो इतरत्र आणखीच बेपर्वाईने वागणार हे उघड आहे.

पुढचा मुद्दा वाढत्या लष्करीकरणाचा. आपला 'इलाका' वाढवण्याचा, म्हणजे, आपले प्रभावक्षेत्र वाढवण्याचा चीनचा प्रयत्न स्पष्ट आहे. मग ते आरमारी शक्तीचे प्रदर्शन असो किंवा नवी अवकाशयाने असोत. NATO च्या लष्करी विस्तारवादाला आपले लष्करी सामर्थ्य भिडवणे हे जशास तसे वर्तन म्हणता येईल, परत, तो श्रेयस्कर पर्याय होत नाही.

बेलारूस किंवा इराण हे आज आंतरराष्ट्रीयदृष्ट्या बहिष्कृत देश आहेत. त्यात पश्चिमेचे राजकारण भले कितीही असो, त्या राज्यकर्त्यांची दमनकारी करतूतही तितकीच जबाबदार आहे. अशा गुंड मंडळींना राजमान्यता देणे म्हणजे 'तुम्ही आणखी दडपशाही करा, आम्ही दुर्लक्ष करू' असे सांगणे आहे.

तात्पर्य, आपल्या देशातील आहे-रे गटाचे हितसंबंध शाबूत राखणे, जमेल तेवढे आणखी मजबूत करणे हे इतर आंतरराष्ट्रीय संघटनांसारखे किंवा आपल्या गल्लीतल्या 'डिस्ट्रिक्ट १३-रोटरी क्लब' सारखे SCO चे धोरण दिसते.

E-mail - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com